2 9 NOV 2021
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधन समस्यांच्या अनुषंगाने प्रतिमाने निर्माणाचा उपक्रम अभिनव

## पी. एस. पाटील : शिवाजी विद्यापीठात पुस्तक प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : संशोधन समस्यांच्या अनुषंगाने प्रभावी उपाययोजना सुचविणारी प्रतिमाने निर्माण करण्याचा उपक्रम अभिनव आहे. हा उपक्रम पुस्तकरुपाने सादर होत आहे, ही अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी शुक्रवारी येथे केले.



विद्यापीठात डॉ. ए. एम. गुरव व लिटॉन मोवाली यांच्या पुस्तकाचे प्रकाशन प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी एम. जे. पाटील, अतुल एतावडेकर, महेश चव्हाण, एम. एस. देशमुख, पी. डी. राऊत उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील डॉ. ए. एम. गुरव व त्यांचे विद्यार्थी डॉ. लिटॉन प्रोसाद मोवाली (बांगलादेश) यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या 'रिसर्च, रिइनव्हेंट अँड रिसॉल्व्ह : मॉडेल्स फॉर इफेक्टिव्ह सोल्युशन्स' या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. डॉ. गुरव आणि डॉ. मोवाली यांनी विविध संशोधन समस्यांवरील उपायांची प्रतिमाने या पुस्तकाद्वारे सादर केली आहेत. ही प्रतिमाने अन्य संशोधन समस्यांवरदेखील उपयुक्त आणि मार्गदर्शक स्वरुपाची ठरतील, अशी आहेत. एक पथदर्शी प्रकल्प म्हणून या पुस्तकाकडे पाहावे लागेल, असे डॉ. पाटील यांनी सांगितले.

यावेळी ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. पी. डी. राऊत, आयक्यूएसीचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, महेश चव्हाण, अतुल एतावडेकर, एम. जे. पाटील आदी उपस्थित होते.

विविध ३१ संकल्पनांवरील प्रतिमाने या पुस्तकात ३१ संकल्पनांवर आधारित मॉडेल्स असून, अशा प्रकारचा हा वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेकडील राज्यातला कदाचित एकमेव उपक्रम असावा. उसाची विविध उत्पादने, कचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन, गूळ प्रक्रिया व इतर अन्न प्रक्रिया, तणाव व्यवस्थापन, विविध प्रतिमानांचा त्यात समावेश असल्याची माहिती डॉ. गुरव यांनी दिली.

लोकमत

# विद्यापीठात उद्या रक्तदान शिबिर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग आणि विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी, शाखा कोल्हापूरतर्फे उद्या, मंगळवारी सकाळी दहा ते दुपारी दोन या वेळेत विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात रक्तदान शिबिर होणार आहे. त्यात विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले.

2 9 NOV 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हिवाळी सत्रातील परीक्षांच्या विलंब, अतिविलंब शुल्कात सवलत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अधिकार मंडळाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ हिवाळी सत्रातील परीक्षांच्या विलंब व अतिविलंब शुल्कात शंभर टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे.

हिवाळी सत्रातील परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही सुरू आहे. परीक्षा शुल्कासोबत कोणत्याही विद्यार्थ्याकडून विलंब शुल्क अथवा अतिविलंब शुल्क स्वीकारण्यात येऊ नये, असे परिपत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर. पळसे यांनी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठातील अधिविभाग प्रमुखांना काढले आहे.

पुढारी

# विद्यापीठात १० डिसेंबरपर्यंत इंटर्नशिप मेळाव्याचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व अक्रॉस द ग्लोब यांच्या संयुक्त विद्यमाने हिवाळी इंटर्नशिप मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा १० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. विद्यापीठाच्या संकेत स्थळावर मेळाव्याची अधिक माहिती उपलब्ध आहे. मेळाव्यात ४० हून अधिक राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय कंपन्या सहभागी होणार आहेत. २०० हून अधिक इंटर्नशिपच्या संधी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणार आहेत. या इंटर्नशीपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान, विविध कौशल्याचे व व्यावसायिक अनुभव प्राप्त करून रोजगारक्षम होण्याची संधी मिळणार आहे. पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना सहभाग घेता येणार आहे. सर्व इंटर्नशिपच्या संधी वर्क फ्रॉम होम स्वरूपाच्या आहेत. मेळावा ऑनलाईन पद्धतीने राबविला जाणार आहे. सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रवेश खुला व मोफत असणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक प्रा. जी. एस. राशिनकर यांनी दिली.